॥ श्री ॥

# श्रीरामकृष्ण परमहंस

: लेखक :

यदुनाथ थत्ते

एक रुपया
म. रा. ... शाखा.
... वाङ्मय विभाग
BVBK-0400358
३५८ ... दिनांक

ग्रंथ प्रकाशक
व
ग्रंथ विक्रेते

श्रीराम प्रकाशन

शनिवार पेठ;
पुणे ४११०३०

## * छान छान गोष्टींची पुस्तके *

| | | |
|---|---|---|
| गणपतीची कथा | जादूचे जहाज | राक्षसाची पेटी |
| जादूचा भोपळा | लबाड जादूगार | संत एकनाथ |
| जादूचा राजवाडा | जादूचा मासा | जादूचा करंडा |
| लाल चोर | एक राक्षस | दोन राक्षस |
| जादूचे पान | जादूचे सरोवर | जादूचे कबूतर |
| महाबळी | अलिबाबा व चाळीस चोर | राजा हरिश्चंद्र |
| जादूची खुर्ची | सोनेरी केसांचा राक्षस | काळा चोर |
| महर्षि आस्तिक | धाडसी राजपुत्र | राक्षसांचा राजा |
| जादूची पेटी | हिमराक्षस | बुटका जादूगार |
| राजपुत्र खुदादाद | जादूगार राजा १ ला | संत नामदेव |
| जादूचा अंगरखा | जादूगार राजा २ रा | नल-दमयंती |
| भीम | जादूगार परी | सात राक्षस |
| श्रीदत्तकथा | सात राजपुत्र | जादूचा आरसा |
| राजा विश्वामित्र | जादूगार चेटकीण | बारा राजपुत्र |
| सुकन्या | भीष्म | जादूचे स्वप्न |
| राजा अंबरीष | उषा | प्राचीन सुंदर गोष्टी |
| तीन जादूगार | संतकथा | जादूची आंगठी |
| झाशीची राणी | संत जयदेव | जादूची पुतळी |
| जादूची तलवार | संतांच्या गोष्टी | जादूचा हिरा |
| जादूचे जोडे | बिरबल १ ला | जादूचा दिवा |
| मगध देशीचा राजा | बिरबल २ रा | संत रामदास |
| जादूगार फकीर | बिरबल ३ रा | लोकमान्य टिळक |
| राजपुत्र राजीव | गुलबकावली | गोपालकृष्ण |

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रकाशिका :
सौ. शैलजा भावे
श्रीराम प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २.

महाशिवरात्र
शके १९००
२५-२-१९७९

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ, पुणे ३०.

# श्रीरामकृष्ण परमहंस



BVBK-0400358

## वारसा

बंगालमध्ये हुगळी हा एक जिल्हा आहे.या जिल्ह्यातून जगन्नाथ-पुरीला जाणारा एक रस्ता आहे. या रस्त्यावर कामारपुकूर या नावाचे एक गाव आहे. या गावात क्षुदिराम चट्टोपाध्याय नावाचे एक धर्मनिष्ठ, सदाचारी आणि कुलसंपन्न गृहस्थ राहात. ते पहिल्यापासून इथे राहात नव्हते. आधी येथून पश्चिमेच्या बाजूला एक कोसावर जे देरे म्हणून गाव आहे तेथे ते राहात असत.बंगाल-मध्ये जमीनदारी पद्धती. हा देरे गाव जमीनदाराचाच. जमीनदार म्हणजे जणु या गावाचे राजे. त्यांची जरब असायची. देऱ्याच्या जमीनदाराचा एक कज्जा कोर्टात होता. क्षुदिरामांची सत्यवक्ते म्हणून सर्वत्र ख्याति होती. त्यांच्या बोलण्यावर सर्वजण विश्वास ठेवीत. जमीनदाराला वाटले. जर आपल्या बाजूने क्षुदिराम साक्ष देतील तर कज्जा आपल्यासारखा होईल. त्याने क्षुदिरामांना तसे सुचविले.

क्षुदिरामांनी खोटी साक्ष द्यायचे नाकारले. जमीनदाराच्या रागालोभाची फिकीर त्यांनी केली नाही. त्या जमीनदाराची कधी कोणी अवज्ञा करीत नसे. क्षुदिरामांनी त्याचे ऐकले नाही. त्यामुळे त्यांच्यावर तो रागावला, संतापला. चार शब्द आपल्या मनासारखे क्षुदिरामांनी बोलले तर काय हरकत आहे, असे त्याला वाटले ! भीष्मद्रोणांनी जेथे ज्याची पोळी खाल्ली त्याच्याशी इमान राखले तेथे क्षुदिरामासारख्या कलियुगातील यत्किश्चित माणसाने सत्यनिष्ठेचा एवढा अहंकार कशाला बाळगावा, असे त्याचे मत.

पण क्षुदिराम अढळ राहिले. जमीनदाराने त्यांना देऱ्यात राहाणे अशक्य केले. क्षुदिराम देरे सोडून कामारपुकूर येथे आले. परमेश्वरावर त्यांची अनन्य श्रद्धा होती. भक्ताचा योगक्षेम चालवण्याची प्रतिज्ञा देव पाळील असा त्यांना विश्वास होता. सत्याची उपासना करायची म्हणजे सत्त्वपरीक्षेची वेळ केव्हाना केव्हा येणारच, हे त्यांना माहीत होते. 'हरीचिया दासा, नाही भयचिंता' अशी त्यांची वृत्ति होती.

देऱ्याहून ते कामारपुकुरास आले. त्यांच्या शुद्ध आचरणामुळे ते आसपासच्या भागात सर्वांना ठाऊक होते. या नव्या ठिकाणी त्यांना मानणारे लोक होतेच. त्यांनी त्यांची काहीबाही व्यवस्था करून दिली. क्षुदिराम परमेश्वराचे अनन्य उपासक होते. ईश्वरस्मरणाने त्यांचे डोळे पाझरत. कामारपुकूरच्या लोकांनी दाखवलेल्या प्रेमामुळे त्यांचा भक्तिभाव वाढला. या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्यामार्फत भगवंताने आपल्याला साह्य केले. त्याची लीला अगाध आहे. त्यानेच परीक्षा पाहण्यासाठी जमीनदाराला रागवायला लावले आणि त्याच दयाघनाने इकडे माझी नीट सोय करून ठेवली ! त्यांच्या अगाध श्रद्धेमुळे शेतात त्यांच्या हातून मूठभर धान्य पडले तरी त्या ठिकाणी प्रचंड पीक यायचे.

क्षुदिरामांचे लग्न झाले होते चंद्रमणीदेवींशी. चंद्रमणी अत्यंत सरळ स्वभावाच्या व प्रेमळ होत्या. त्यांचे मन करुणेने भरलेले

असे. परोपकार आणि सेवा यांचा त्या जणु आदर्श होत्या.

जगन्नाथपुरीच्या ऐन रस्त्यावर म्हणजे संतांच्या मार्गावर राहायला आल्याचा दोघांना आनंदच झाला. भक्तिभाव वाढीला लागला.

क्षुदिराम साठ वर्षाचे आणि चंद्रमणी ४५ वर्षांच्या असताना दिनांक १७ फेब्रुवारी १८३६ रोजी त्यांच्या घरी एक मुलगा जन्मला. या घटनेचे सर्वांना मोठे आश्चर्य वाटले! या मुलाचे नाव त्यांनी ठेवले गदाधर. त्याला सगळे लाडाने म्हणायचे गदाई.

गदाई लहानपणापासूनच फार सुंदर, बाळसेदार. त्याचा हसरा चेहरा पाहून सगळ्यांना तो हवाहवासा वाटे. त्याच्यावर सगळे ममता करीत, त्याला घ्यायला सगळे तयार असत.क्षुदिराम आणि चंद्रमणी याना तर तो जीव की प्राण वाटायचा. □

**बालपण**

गदाई दिवसामासी वाढू लागला. दंगामस्ती, खोड्या करू लागला. त्याच्या खेळकर आणि खोडकरपणामुळे लोकांची त्याच्यावरची माया वाढू लागली.घरी गोडधोड केले की गदाईसाठी स्त्रिया कोरभर बाजूला काढून ठेवीत आणि तेवढे त्याच्या मुखी गेल्याशिवाय त्यांना समाधान होत नसे. गदाईची स्मरणशक्ती अलौकिक होती. करायचे ते पूर्ण एकाग्रतेने अशी त्याला संवय.त्यामुळे एकदा ऐकले तरी ते त्याला आठवायचे.उजळणीतले पाढे मात्र त्याला आवडायचे नाहीत. रोजच्या रोज तेच तेच घोकायचा त्याला कंटाळा वाटायचा.

वडिलांनी त्याला शाळेत घातले. शाळेत त्याला खूप सोबती मिळाले. पण गुरुजींचा जाच होऊ लागला. गदाईवर त्यांच्या मित्रांचा भारी लोभ. त्याच्या आज्ञेत ते असायचे. पाठशाळेत मन रमत नाहीसे वाटले की गदाई सोबत्यांना घेऊन खेळायला निघून जाई. यात्रा, भजन, कीर्तन याची त्याला विशेष गोडी होती. त्यासाठी शाळा बुडली तरी त्याला काही वाटत नसे.

त्याचे कुतूहल आणि जिज्ञासा फार तीव्र असे. कोणी काही करायला सांगतले तर मनाला पटल्याशियाय ते तो करायचा

नाही. स्वत:ला समजले नाही की थोरामोठ्यांना प्रश्न विचारायचा. जरा त्याना नीट कारणे सांगता आली व ती पटली तर त्याप्रमाणे तो तत्परतेने वागे नाही तर काही केल्या ऐकायचा नाही. त्याच्या प्रश्नांमुळे आईवडील आणि गुरूजी यांची मोठी अडचण होई, पण धाकदपटशाने ऐकण्याइतका गदाई सीधा नव्हता. धर्माने सांगितले आणि आपले आजेपणजे करीत आले म्हणून निमूटपणे वडीलधारी माणसे ज्या गोष्टी कारण न समजता करीत त्यासुद्धा गदाईला पटल्यावाचून तो करायचा नाही.

गदाधराला अमुक एक जागा वर्ज्य म्हणून नसायची. एकदा कुंभार मातीच्या मूर्ति करतो ते तो पाहून आला. बस त्याच्या मनाने तोच ध्यास घेतला. मातीचा गारा करून तोहि मूर्ति करू लागला. अशा सुबक आणि सुंदर मूर्ति करायचा की पहात रहावेसे वाटे. आणि ह्या मूर्ति करताना त्याची स्वत:ची मूर्ति सुंदर की त्याने बनविलेली मूर्ति सुंदर असा प्रश्न पडे! एकटक ह्या दोन्ही मूर्तीकडे पहात रहावे ! मूर्तीनंतर चित्रे काढायला तो शिकला.

कथाकीर्तनाची त्याला फार गोडी वाटायची. गावाबाहेरच्या धर्मशाळेत साधुबैरागी उतरत.गदाई तेथे जाऊन बसायाच्या,त्याच्या गोष्टी ऐकायचा. मग कोणी त्याला एकादे भजन शिकवी. कोणी दोहा सागे. एकादा साधु त्याच्यावर खुष होऊन त्याला सजवी. त्याला टाळेमाळा लेववून साधू बनवी.चंद्रमणीला ह्या साधूंची मोठी धास्ती वाटे गदाईला ते घेऊन तर जायचे नाहीत बरोबर ! पण हे बोलायची सोय नव्हती. गदाईला भीती म्हणून कसली ती ठाऊकच नव्हती. मोठमोठी माणसे भुताच्या भयाने जायला कचरत तिथे तो निर्धास्तपणे जायचा.

गदाईचा गळा गोड. तो साधूंनी शिकवलेली भजने आस-पासच्या स्त्रीयांना तन्मयतेने गाऊन दाखवायचा. त्या पदाशी असा

एकरूप होई की कधी त्याच्या डोळ्यातून न कळत अश्रू ओघळू लागत, तर कधी भान विसरून तो नाचू लागे. ऐकलेल्या गोष्टीहि तो हावभाव करून मोठ्या खुबीदारापणाने सांगे.

गदाधराचे मन फार हळवे. त्याच्यावर चटकन कोणत्याहि गोष्टीचा परिणाम व्हायचा. उत्कष्ट काहीहि दिसले की जणू देहभान हरपायचे. काळ्या ढगांच्या पाश्वभूमीवर स्वच्छ,निर्मळ बगळ्यांची एखादी रांग उडत गेलेली दिसली की त्या दृश्याच्या आनंदाने गदाधर बेहोष व्हायचा.लोकाना समजायचेदेखील नाही की त्या दृश्यात आनंदाने बेहोष होण्यासारखे आहे तरी काय ?

□

## खोडचाळ गदाधर

गदाधर वाढत होता. त्याला सातवे वर्ष लागले आणि त्याचे वडील क्षुदिराम ऐन दसऱ्याच्या दिवशी एकाएकी वारले. गदाधरच्या मनावर त्याचा फार परिणाम झाला. त्याचा आनंद जणू मावळला.एकदम तो गंभीर दिसायला लागला.लोकाना टाळून कुठेतरी एकटाच तो स्वत:च्या तंद्रीत बसलेला दिसायचा. हसरा खेळकर गदाधर सर्वांचा आवडता मित्र आता पूर्वीसारखा प्रसन्न दिसेना 'मिळून मिसळून वागेना त्याच्या वागण्याचे सर्वांना मोठे कोडे पडले.

वडिलांच्या निधानाचे दुःख आईला किती विलक्षण असेल याची गदाईला जाणीव झाली, तशी त्याने आपले दु:ख आवरले! आईचे दु:ख कमी व्हावे म्हणून तो प्रयत्न करू लागला. आईला कामात मदत करी. तिला रामायण, महाभारत वाचून दाखवी किंवा गोष्टी सांगे. गदाधराची वाणी मोठी मधूर, त्यामुळे त्याच्या तोंडचे ऐकायला आसपासच्या स्त्रियाहि येऊन बसत. आईला तेवढाच विरंगुळा वाटे शेजारपाजारच्या बायका त्याला वाचून दाखवण्यासाठी आग्रह करीत.

गदाधर सात वर्षांचा झाला. त्याची मुंज केली पाहिजे, असे त्याच्या वडील भावाला वाटू लागले. गदाधरला सांभाळण्यासाठी लहानपणी एक आजीबाई ठेवल्या होत्या. त्या जातीने लोहार होत्या. त्यांचे नाव धनी. आजीबाईचे गदाधरवर फार प्रेम होते. गदाधराच्या मुंजीच्या गोष्टी सुरू झाल्या तशी धनी म्हणाली : " गदाई भिक्षावळीच्या वेळी पहिली भिक्षा तू माझ्याकडून घे, मी तुझी भिक्षामाता होईन."

तिचा तो भोळा भाव पाहून गदाई विरघळला. म्हणाला: "धनी मा, घेईन हो तुझ्याकडून पहिली भिक्षा."

इकडे घरात मुंजीच्या वाटाघाटी जोरात सुरू झाल्या. गदाधरने एक दिवस सांगून टाकले : " पहिली भिक्षा मला धनीमाकडून घेऊ देणार असाल तरच माझी मुंज करा."

"गदाई, असा का रे हटवदीपणा करावा. लोहारणीच्या हातून काय भिक्षा घ्यायची ?"

" पण मी तिला कबूल केले आहेना. आता का ते वचन परत घेऊ?"

"अरे, पण कुळमर्यादा नको का सांभाळायला ?"

" दिलेला शब्द न पाळणे ही का कुळमर्यादा? माझी वाणी का खोटी करू? खोटे बोलणाराला उपनयनाचा कोठला अधिकार?"

गदाईचे म्हणणे खरे होते आणि त्याचे मनहि घट्ट होते. शेवटी त्याच्या इच्छेप्रमाणे पहिली भिक्षा धनी लोहारणीकडून घ्यायची त्याला परवानगी मिळाली आणि त्याची मुंज पार पडली. आता देव पूजेचा हक्क आपल्याला मिळाला, याचा त्याला भारी आनंद झाला.

या काळात एक गोष्ट मोठी विचित्र झाली. गदाधरच्या मनात शाळेसंबंधी अढी बसली, कोणी शाळेत जायचा आग्रह केला कीं तो म्हणायचा, "ती विद्या शिकून काय उपयोग? शिकलेल्यांना साधा

सदाचाररहित तर ती देत नाही! आणि पोटासाठी का विद्या शिकायची? पैसा मिळवण्यासाठी शाळेत जाण्यापेक्षा न गेलेले काय वाईट?"

शाळेत जाण्याऐवजी तो मग गावाजवळच्या आंबराईत पळून जायचा. जाताना इतर सोबत्यांना घेऊन जायचा. त्यांनी नाटक बसवायचे ठरवले. गदाधर सर्वांना अभिनय शिकवीत असे. त्याचे निरीक्षण असे बारकाव्याचे असे की, कोणाचीही नक्कल तो हुबेहूब उठवून द्यायचा.

कामारपुकूरमध्ये त्यावेळी दुर्गादास पाईन नावाचे एक धनाढ्य गृहस्थ होते. त्यांच्या घरात स्त्रियांना गोषा असायचा. त्यांना त्या गोषाचा भारी अभिमान. सांगायचे: "आमच्या घरातल्या स्त्रीचे नखसुद्धा कोणाला कधी दिसायचे नाही!"

गदाधर म्हणायचा: "गोषा अमानुष आहे. गोषा हे काही पावित्र्याचे लक्षण होऊ शकत नाही. आणि या गोषाची इतकी घमेंड तुम्हाला असेल तर एक दिवस गोषातल्या तुमच्या स्त्रियांना पाहीन आणि मग सांगेन."

एक दिवस स्त्रीवेषाने गदाधर त्यांच्या घरात गेला. त्या स्त्रियांच्यात राहिला तरी कोणाला कळले नाही. मग गदाधराने दुर्गादासांना सांगितले, तेव्हापासून त्यांच्या घरातला गोषा कमी झाला.

गदाधराचे मन फार हळुवार. सर्वांच्याविषयी त्याला प्रेम वाटे. गावकऱ्यांनाही तो गोष्टी सांगायचा, वाचून दाखवायचा. वाचता वाचता प्रभुभक्तीचा उत्कट प्रसंग आला की गदाईचे देहभान हरपे. तो न कळत नाचू लागे.

गदाधराच्या विक्षिप्त वागण्याने त्याच्या घरच्या मंडळींना त्याची फार काळजी वाटे. शाळेत न जायचा त्याचा हट्ट, दिवसभर करीत असलेला हूडपणा यामुळे याचे पुढे कसे होईल याची चिंता त्यांना वाटे.

## कालीच्या छायेत

वडिलांच्या मृत्यूनंतर घरखर्च निभेना तेव्हा गदाधराचा वडील भाऊ कलकत्ता येथे आला. त्याने झामारपुकुरात एक पाठशाळा उघडली. चारदोन घरची पूजा तो करायचा. एवढे सगळे काम त्याला एकट्याला आटपत नसे. इकडे घरी गदाधर उनाडक्याच करीत होता. पंधरा-सोळा वर्षांचे वय झाले तरी शाळेत जात नव्हता. घरच्या लोकांनाही त्याची काळजी लागली होती.

असे ठरले की गदाधरला कलकत्त्याला मोठ्या भावाकडे पाठवावे. भावाचीच पाठशाळा असल्याने आपोआपच तो शिकायलाही लागेल आणि भावालाही त्याची थोडीफार मदत होईल. १८५३ साली वयाच्या सतराव्या वर्षी रामकुमार त्याला कलकत्त्याला घेऊन आला.


कलकत्त्यात येताच रामकुमारने चारदोन पूजा गदाधरकडे सोपवल्या. तेवढ्या तो नेमाने आणि मन लावून करी. शाळेत मात्र त्याचे चित्त नसे. रामकुमारला त्याची चिंता वाटे. गदाधरला मग तो टाकून बोले. एकदा गदाधर त्याला म्हणाला: “भातभाकरी मिळण्याची विद्या मला नको आहे. हृदयात ज्ञानाचा उदय होऊन जिने जीवन कृतार्थ होते अशी विद्या मला हवी आहे.”

बिचारा रामकुमार ह्या उत्तराने चूप बसला. गदाधराचा हटवादी स्वभाव त्याला ठाऊक असल्याने त्याच्या कलाकलाने जे काही जमेल तेवढे करून घ्यायचे असे त्याने ठरवले.

त्या काळीं कलकत्त्याला राणी रासमणी देवी ही एक थोर स्त्री होती. ती जातीने कोळी होती. आपल्याकडील अहिल्याबाई होळकर यांच्याप्रमाणे ती मोठी कर्तबगार आणि धर्मशील होती. परोपकार आणि देवधर्म यांत तिचा काळ जायचा.

रासमणीने कलकत्त्याच्या दक्षिणेला एक प्रचंड काली मंदीर बांधले. तो काळ मोठा विचित्र होता. धर्मावर रूढीची झापड

आली होती. स्वतःप्रमाणेच सर्वव्यापी देवालाही जातीच्या पाशांत लोकांनी जखडले होते. शूद्रांच्या देवाला म्हणे उच्चवर्णीय नमस्कारही करीत नसत ! राणी रासमणीला चिंता लागून राहिली होती की, आपण बांधलेल्या ह्या काली मंदिरातील पूजा कोण करणार?



धर्मनिष्ठ रामकुमाराची हकीगत तिला कळली आणि तिने त्याला निरोप पाठवला. रामकुमारने ते काम पत्करले.

गदाधरावर यावेळपर्यंत रूढीचा फार पगडा होता. दक्षिणेश्वरला आल्यावर पहिल्या दिवशी त्याने तिथले अन्न खाल्ले नाही. गंगाकिनारी हाताने शिजवून त्याने खाल्ले. रात्री देवीचा प्रसाद मात्र तो खात असे. पण त्याही वेळी रडत म्हणायचा : "जगदंबे, कोळ्याच्या हातचे का खायला लावतेस ?"

अन्न जरी गदाधर हातांनी शिजवून खात असला तरी त्याची

अनिवार देवभक्ति तेथेही चालून होती. त्याचा तो भक्तिभाव पाहून राणीने एक दिवस त्याला आपल्या घरच्या देवपूजेचे काम पत्कर-ण्याचा निरोप धाडला. गदाधरने उलट कळवले : " एका भगवंता-वाचून कोणाचीही चाकरी मला करायची नाही ! "

राणीचा जावई माथूरबाबू आपल्याला ह्याबाबत पुन्हा विचा-रील या भीतीने तो त्यालाही टाळू लागला. देवपूजा पत्करायला गदाधराची हरकत नव्हती, पण दागिन्यांचे लफडे कोणी सांभाळा-यचे ? याच सुमारास त्यांचा भाचा तेथे आला होता, त्याने दागिने सांभाळायचे कबूल केले, तेव्हा पूजेचे काम गदाधराने पत्करले.

कालीची पूजा गदाधर मोठ्या प्रेमाने आणि तन्मयतेने करी. लोक नुसते एकटक पहात राहात. देवाला आळविणारी गीते अत्यंत कळ-वळून तो म्हणे. त्याच्या डोळ्यांतून आसवे ओघळू लागत. रडत रडत तो म्हणे : " आई, मला दर्शन दे. मला दुसरे काही नको."

पाण्यात बुडवल्यावर वर येण्यासाठी जसा प्राण व्याकुळ होतो तशी व्याकुळता देवदर्शनासाठी सहज वाटू लागली की, त्याचे दर्शन होईल, असा त्याचा विश्वास होता.

कालीमंदिराच्या आवारात एका बाजूला अश्वत्थ, बेल, वड, अशोक आणि आवळी यांची एक पंचवटी होती. गदाधर तिथे एकटाच जाऊन ध्यानचिंतन करीत बसे.

आपल्या मनातली उच्चनीच भावना गेल्याशिवाय चित्त निर्मळ होणार नाही आणि चित्त गंगाजळासारखे निर्मळ झाल्यावाचून ईश्वरदर्शन कोठले ? आपल्या मनातली मोठेपणाची भावना घालव-ण्याच्या प्रयत्नाला गदाधर लागला. त्याने अहंकार जावा म्हणून शौचकूप साफ करावे, भिकाऱ्यांचे जेवण झाल्यानंतर तेथल्या पत्रावळी उचलाव्या, उष्टे-खरकटे काढावे, झाडलोट करावी आणि ही सगळी शिवसेवा समजावी. रात्री देवीपुढे रडत रडत म्हणावे :

" आई, आणखी एक दिवस फुकट गेला ! "

त्याच्या ह्या अलौकिक व्याकुळतेमुळे त्याला कालीचे दर्शन झाले. अलौकिक आनंद त्याच्या जीवनात निर्माण झाला. सर्वत्र प्रभूच भरला आहे, असे भासू लागले. असा भावावेश आला म्हणजे त्याची 'मी–तू' भावना गळून पडे. कधी या भावावेशात तासन् तास खपून देवीसाठी केलेले हारतुरे तो स्वतःच घेई. जवळ जवळ सहा महिने तो या भावविभोर अवस्थेत होता.

तो म्हणायचा : " भक्ति म्हणजे पोरखेळ नाही. ती झेपण्याचे सामर्थ्य अंगी पाहिजे. चित्त निर्मळ पाहिजे." तो कालीची प्रार्थना करताना म्हणायचा : " आई, अहंकाराचा वारा मला शिवू देऊ नकोस. हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा चांभार, हा भंगी, हा ढोर, हा महार असले क्षुद्र भेद माझ्या मनात येऊ देऊ नकोस. ही सारी तुझीच रूपे असा माझा भाव दृढ कर. "

कधी साफसफाई करताना म्हणे : "आई, माझा सगळा अभिमान नष्ट कर. एखाद्या भंग्यापेक्षा मी श्रेष्ठ असाही अभिमान माझ्या मनाला शिवू देऊ नकोस. "

## साधना

गदाधराची ती अवस्था पाहून कोणाला वाटायचे, याला भुताने झपाटले असावे. कोणी म्हणायचे त्याला वात झाला आहे. कोणी म्हणावे त्याला बुद्धिभ्रंश झाला आहे आणि ज्याने त्याने आपापल्यापरी इलाज करावे. कोणी त्यास घालवेडे समजून त्याची परीक्षा घ्यावी. कधी एखाद्याला वाटावे, स्त्रीसौख्याच्या अभावामुळे याचे डोके फिरले असावे !

गदाधराच्या विक्षिप्त वागण्याने सर्वांनाच वाईट वाटायचे. त्याला ताळ्यावर आणण्यासाठी कोणी मांत्रिक बोलावले, कोणी वैद्याकडून परीक्षा करवली. एकाने त्याच्या खोलीत एका रात्री एक बाजारू स्त्री

पाठविली.तिला नमस्कार करून गदाधर दुसऱ्या खोलीत निघून गेला.

एका वैद्याने मात्र त्याला तपासून सांगितले, "याला रोगबीग काही नाही वा भूतपिशाच्चाने याला झपाटले नाही.भक्तीचा प्रबळ आवेग याच्या शरीराला झेपत नाही, म्हणून हा वेडयासारखे करीत आहे. व्यापारात चार पैसे अचानक जास्त मिळाले, अनपेक्षित फार मोठे यश लाभले म्हणजे माणूस जसा आनंदाने बेहोश होतो तशी उन्मादावस्था ईश्वरदर्शनाने येते. यात भिण्याजोगे काही नाही."

रासमणीचे जावई माथूरबाबू यांनी या वेळी यात्रेला जाण्याचा घाट घातला.गदाधरालाही आपल्याबरोबर यायला सुचविले. त्याने कबूल केले. मोठ्या लवाजम्यानिशी ही सगळी मंडळी रवाना झाली.

वैद्यनाथजवळच्या एका खेडयात भीषण दारिद्र्य पसरलेले पाहून गदाधर व्याकुळ झाला.त्याच्याच्याने ते पाहावेना. माथूरबाबूला तो म्हणाला: " तू तर आईचा कोठीवाला! तिची लेकरे अशी दु:खात आणि तू का संपत्ती सांठवून ठेवणार? या सर्वांना एकेक वस्त्र दे, त्यांना चांगले जेवण घाल आणि तेलमीठ दे." माथूरने त्याची अज्ञा पाळली. यात्रा करून सगळी मंडळी परत आली.

गदाधर सांगे : " त्याग आणि संयम यांचा अभ्यास केला म्हणजे इंद्रियांना व मनाला वश करून घेता येते. ह्या साधनाने अंत:करण शुद्ध आणि पवित्र होते. अशा माणसाचे मनच मग त्याचे गुरू बनते आणि त्याला योग्य मार्ग दाखवते."

त्यागाचा अभ्यास करण्यासाठी एका हाती सोनेनाणे घ्यावे, दुसऱ्यात मातीची ढेकळे घ्यावी; ती ह्या हातातून त्या हातात खेळवीत गंगेत टाकून द्यावी. म्हणावे: " ही माती ! हे सोने! मातीतून धान्य निपजते. सोन्यातून ते निपजत नाही !"

गदाधराचे वय वाढत चालले तशी त्याच्या लग्नाची फिकीर घरची मंडळी करू लागली. लोकांचा नेहमी एक आक्षेप असतो:

" त्यांनी लग्न केले नाही म्हणून त्यागाच्या, संयमाच्या गोष्टी बोलतात. लग्न केले असते म्हणजे सगळे समजले असते!" गदाधराने विचार केला की हा आक्षेप खरा नाही.ज्याला ईश्वरी साक्षात्कार झाला त्याची संवेदना, जाणीव इतकी तरल असते आणि विश्वास इतका दृढ असतो की त्याग, संयम हा त्याचा सहजधर्म होतो. जगाच्या मांगल्यावर व सद्भावावर त्याचा विश्वास असतो. सर्वाभूती भगवन्त याचा हाच अर्थ आहे.



जेव्हा घरच्या लोकांनी फार आग्रह केला तेव्हा जयरामवाटी या गावात रामचंद्र मुखोपाध्याय नावाचे गृहस्थ राहात. त्यांच्या मुलीशी गदाधराने लग्न केले. शारदामणी हे त्या मुलीचे नाव. गदाधर या वेळी २३–२४ वर्षांचा होता, तर शारदादेवी सहा वर्षाची होती.

लग्नानंतर गदाधर पुन्हा दक्षिणेश्वरी आला आणि त्याची साधना सुरू झाली. जवळ एक तपभर त्याची साधना चालू होती. साधनेचे सर्व मार्ग त्याने चोखाळले. आरंभी शक्तिमंत्राची दीक्षा घेऊन त्याने साधना केली. त्यानंतर त्याने तंत्रपद्धतीने साधना सुरू केली.

तंत्रशास्त्रात सवर्ण-अवर्ण, स्त्री-पुरुष, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद मानीत नाहीत. तंत्रमार्ग हा स्त्रीशूद्रादि सर्वांना खुला असतो. ह्यात

स्त्रियांना अत्यंत पूज्य आणि पवित्र मानतात. या साधनेत कामवासनेचा संपूर्ण निरास करावयाचा असतो. स्त्री-पुरुष असा भेद मनात न आणता सर्वांबद्दल विकाररहित केवळ प्रेम मनात वागवावयाचे असते.

त्यानंतर त्याने भक्तिसाधना केली, शांत, दास्य, सख्य,वात्सल्य व मधुरा हे सर्व वैष्णवमार्ग त्याने चोखाळले. या पंचभावांपलीकडे अद्वैतभाव असतो. इंद्रियभोगांविषयी पूर्ण उदासीन झाल्याशिवाय अद्वैतभाव संभवत नाही. ही अवस्था आल्यावर त्याने अद्वैतभावाची वेदान्तदीक्षा घेतली. लोकलाभाच्या सर्व आशा-इच्छा या क्षणापासून सोडून दिल्या आणि जगातील सर्व प्राणिमात्रांना अभयदान दिले. तोतापुरी नावाच्या महंतांनी त्याला ही दीक्षा दिली आणि त्यांना नाव दिले 'श्रीरामकृष्ण.'

ह्या साधनेमुळे माणसाची जाणीव आणि संवेदना फार प्रचंड प्रमाणावर वाढते. त्याला दुसऱ्याचे भाव चटकन् प्रतीत होतात. पशुपक्ष्यांचे मनही समजू लागते. सर्वांविषयी अपार प्रेम आणि जिव्हाळा वाटू लागतो. जीवन सेवामय होते, सहज हातून उपकार घडत राहातो.गंगेप्रमाणे पुण्यपावन असा जीवनप्रवाह वहात असतो; कोणीही यावे आणि आपले भले करून घ्यावे.

रामकृष्णांना त्यांच्या साधनाकाळात असा अनुभव आला की, शिष्य ज्याप्रमाणे सद्गुरूला शोधीत असतो त्याचप्रमाणे गुरूही सच्छिष्याच्या शोधातच असतो. गाईची कास भरली कीं तिला पान्हा आवरत नाही. ती वासरासाठी धांवत येतेच. ज्या ज्या वेळी त्यांच्या मनात जी जी साधना करण्याचीं उत्कट भावना येई ती ती त्यांची भावना पूर्ण करणारा गुरू त्यांच्यापाशी स्वतःच आलेला असे.

□

## सर्वधर्मसमभाव

अद्वैतभाव ही साधनेचीं अत्युच्च अवस्था. हा भाव कायम अंगी

आला म्हणजे समाधि स्थिर झाली. ज्ञानेश्वरांनी यालाच उद्देशून ' योगियां साधली जीवनकला ' असे म्हटले आहे. ही जीवनकला साधली म्हणजे परम समाधान जीवनात येते. मनुष्य प्रेममय, सेवामय होतो. त्याच्यातली आपपर बुद्धि नष्ट होते.

रामकृष्णांना ही अवस्था साध्य झाली त्या वेळची एक गोष्ट. तोतापुरी अद्वैती असले तरी सोवळचा-ओवळयाबद्दल त्यांचा कटाक्ष असे. एक दिवस पेटवणासाठी म्हणून रामकृष्णांनी त्यांच्या धुनी-तल्या लाकडाला हात घातला, त्याबरोबर हाती चिमटा घेऊन तोता-पुरी त्यांच्यावर धावले! रामकृष्ण हसून म्हणाले: " वा रे अद्वैती! "

तोतापुरींचे अवसान नाहीसे झाले. त्यांनी आपली चूक कबूल केली आणि श्रीरामकृष्णांना धन्यवाद दिले.

रामकृष्णांची आई या वेळी कलकत्त्यात आली होती. रामकृष्ण अत्यंत प्रेमाने तिची सेवाचाकरी करीत. आप्तांची सेवा, सहज भेटलेल्या प्राप्तांची सेवा आणि आर्तांची सेवा अशी त्रिविध सेवा अद्वैती असेल त्याच्या हातून सहजी घडू लागते.

या काळात गोविंदराय या नावाचे एक साधक दक्षिणेश्वरी आले होते. त्यांनी विविध धर्म आणि उपासनापद्धति यांचा उत्तम अभ्यास केला होता. त्या वेळी ते इस्लामी पद्धतीने साधना करीत होते. त्या साधनापद्धतीचे रहस्य रामकृष्णांनी जाणून घेतले. श्री. शंभुचंद्र मल्लिक यांच्याकडून ख्रिस्ती धर्म, येशूचे जीवन व उपासनापद्धति यांचीही माहिती करून घेतली. ते म्हणत : " इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म हेही जगदंबेच्याच उपासनेचे भिन्न मार्ग आहेत. कोटचवधींची जीवने जर ह्या मार्गाने धन्यता पावतात तर जगदंबेच्या ह्या रूपातील लीलांचाही अनुभव घेतलाच पाहिजे.

दुसऱ्या एका वेळी त्यांनी शिष्यांना सांगितले: " जेथे इतर लोक पूज्य भावनेने पूजावंदनादि करतात ते स्थान तुम्हीही पवित्र

माना. कारण ज्या स्थानाविषयी इतके लोक पूज्यभाव बाळगतात तेथे साक्षात् ईश्वर असलाच पाहिजे."

सत्याच्या अंशभागाचे दर्शन होऊन त्यांतून पंथ निर्माण होतात. ज्याला संपूर्ण सत्याचे दर्शन झाले, त्याचे अंशमात्र दर्शन झालेल्यांशी काहीं भांडण असत नाही आणि त्यांच्यासारखा आग्रहीपणा किंवा अभिमानही त्याच्यात नसतो. वेगवेगळे पंथ आणि धर्म हे ईश्वराकडे जाणारे वेगवेगळे मार्ग आहेत. धर्माचा झगडा धर्माशी असू शकत नाही. सगळ्या धर्मांचे भांडण अधर्म आणि अनीति यांच्याशी आहे. वेगवेगळ्या धर्मात भांडण कल्पिणे हे अज्ञानाचे द्योतक आहे, अशी रामकृष्णांची शिकवण होती.

दोन वाटसरूंनी एकदा एक सरडा पाहिला. पुढे त्यांच्या गोष्टीत त्याबद्दल उल्लेख आला.

एकजण म्हणाला: "किती सुंदर जांभळा रंग होता !"

दुसरा म्हणाला: "काय खोटे सांगता हो, का माझी परीक्षा पाहाता ? कसा लाल लाल होता तो सरडा."

झालं ! दोघांची चांगलीच जुंपली. त्यांचा वाद सरेना. शेवटी जवळच्या गावात एक शहाणा माणूस राहतो असे त्यांनी ऐकले होते. त्याच्याकडे जावयाचे त्यांनी ठरवले.

त्याच्याकडे जाऊन दोघांनी आपापल्या बाजू सांगितल्या. त्याने दोघांचेही बरोबर आहे असे सांगितले. तेव्हा ते दोघे एक होऊन त्याच्याशी भांडू लागले–'दोघांनाही तुम्ही बरोबर कसे म्हणता ?' असे विचारू लागले.

तो म्हणाला : बाबांनो जरा शान्त व्हा. क्षणभर सरडा तुम्ही पाहिला आणि एकमेकांशी भांडायला लागला. शान्त व्हा आणि निवान्तपणे त्याचा खेळ पहा म्हणजे मी म्हणतो ते खरे की खोटे ते तुम्हांला समजेल. सरडा क्षणाक्षणाला रंग पालटतो आणि हेच त्याचे वैभव आहे !"

परमेश्वराचे वैभवही असेच अमर्याद आहे. दरक्षणी तो नवनवी रूपे घेतो, साज करतो. हे ज्याला उमगले तो मग वाद घालीत नाही, भांडत बसत नाही.

रामकृष्णांची दृष्टी ही अशी सम झाली होती. पूर्ण ज्ञानाचे ते लक्षण आहे. त्यांनी बुद्ध, जैन, शीख या धर्मांची माहिती करून घेतली व त्या अनुरोधाने त्यांनी साधनाही केली. बुद्धि प्रगल्भ झाल्यानंतर ज्याप्रमाणे माणसाला वेगवेगळे विषय सहज आकलन करता येतात तसे रामकृष्णांचे झाले होते. त्या त्या पंथाच्या लोकांना जे साध्य करण्यासाठी वर्षानुवर्षे अनुष्ठान करावे लागे ते रामकृष्णांना सहज साध्य होऊन जाई. त्यांच्या गुरुजनांनाही त्यांच्या ह्या अद्भुत गतीचे आश्चर्य वाटे !

पुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरात बुद्धदेवाचा प्रकाश आहे व त्यामुळे तेथे जाताच जातिभावना नष्ट होते, असे पुरीचे माहात्म्य सांगतात. रामकृष्णांनी हे ऐकले तेव्हा त्यांना जगन्नाथ यात्रेला जाण्याची इच्छा झाली. परंतु त्यांच्या अंतःकरणात सर्वसमभाव उदयाला आल्यामुळे ते जेथे होते तेथेच जगन्नाथपुरी होती, त्यामुळे त्यांनीं तिकडे जाण्याचा आग्रह धरला नाही.

रामकृष्णांच्या पत्नीही सात-आठ वर्षानी त्यांच्याकडे कलकत्त्याला आल्या.रामकृष्ण त्यांना धर्म व साधना या गोष्टी समजावून सांगत. संतानवासना असेल तोवरच पतिपत्नी हे नाते टिकते. संतानवासना नसेल तर स्त्री ही मैत्रिण, भगिनी, माता बनते. शारदामणी रामकृष्णांची मनोभावे सेवा करीत. त्यांना कामवासना राहू नये म्हणून रामकृष्ण जगदंबेला विनवीत. म्हणत: " आई, तिला कामगंधहीन कर."

शारदामणींनी एकदा त्यांना विचारले: 'मी कोण आहे सांगा?'

रामकृष्ण म्हणाले: " एका आईने मला जन्म दिला, दुसरी माता जगदंबा काली मंदिरांत विराजमान आहे आणि माझी

रात्रंदिवस सेवाचाकरी करणारी तू तिसरी एक माता आहेस !"

□

## नरेंद्राची भेट

कबीरांनी म्हटले आहे: साधु गांठीला कांही बांधत नाही, पोटापुरते घेतो, सर्वत्र हरि भरलेला आहे आणि हा असा अद्भुत दाता आहे की, मागावे तेव्हा देतो. मग साधूला संग्रह हवाच कशाला ?

साधु गांठी न बांधई, उदार समता लेय ।
आगेपीछे हरी खडे, जब मांगे तब देय ॥

रामकृष्णांची भावना अशीच होती. सृष्टीच्या वैपुल्यावर त्यांचा अथांग विश्वास होता. ज्याचा असा विश्वास त्याला चिंता राहात नाही. आपला सृष्टीच्या विपुलतेवर विश्वास नसतो त्यामुळे आपण संग्रह करीत जातो आणि हा संग्रह ईर्षा, मत्सर द्वेष यांना जन्म देतो.

दीर्घ साधनेमुळे रामकृष्णांची संवेदना फार तरल झाली होती. त्यांच्या वस्त्राला कोणी साधी गांठ जरी मारली तरी लगेच त्यांचे हात पाय वळायला लागत. एकदा त्यांची परीक्षा पाहाण्यासाठी त्यांच्या बिछान्याखाली कोणी नाणी ठेवली. त्याच्यावर अंग टाकताच त्यांच्या शरीरात तीव्र दाह होऊ लागला.

रामकृष्णांच्यात निरागस बालभाव सतत असे. एकदा रामकृष्ण बागेत फिरत असताना त्यांना माळी समजून एका गृहस्थाने फुले तोडून आणायला सांगितली. रामकृष्णांनी मोठ्या अदबीने बागेतली उत्तम फुले तोडून त्यांना अर्पण केली !

केशवचंद्र सेन यांच्याशी रामकृष्णांचा स्नेह जमला. रामकृष्णांचे अद्भुत सामर्थ्य प्रत्ययाला आल्यावर त्यांनी वृत्तपत्रांत त्यांच्याविषयी इंग्रजीत लेख लिहिले. त्यांच्याकडे येणारांची गर्दी वाढू लागली.

कोणी येतांना दिसला की रामकृष्ण विनीत भावाने स्वत:च

त्याला आधी नमस्कार करीत.

कोणी त्यांना गुरु म्हणून संबोधाले तर ते त्याच्यावर रागावून म्हणत : "कोण कोणाचा गुरु ! एक ईश्वरच गुरु तोच कर्ता-करविता ! मी तर हीनाहून हीन, तुमच्या दासांचा दास आहे."

ते क्वचित् रागावत. पण मग सांगत : "अरे, सज्जनांचा राग म्हणजे पाण्याचा डाग. क्षणभर दिसला तरी दुसऱ्या क्षणी सुकून होता नव्हतासा व्हायचा !"

रामकृष्णांचा अदभुत भाव, त्यांचे विशुद्ध आचरण आणि त्यांच्या जीवनांत भरलेला निरंतर आनंद यांमुळे लोक त्यांना परमहंस म्हणू लागले. रामकृष्ण परमहंसांकडे हळूहळू लोकांची रीघ लागू लागली. त्यांच्याकडे येणारा सुशिक्षितांचा भरणा पुष्कळ असे. कॉलेजांतले विद्यार्थी त्यांच्याकडे येत. नरेंद्रनाथ दत्त हा तरुण कॉलेजकुमार त्यांच्याकडे यायचा. रामकृष्णांनाही या सख्यासोयऱ्यांची मोठी ओढ असायची. ते उत्कंठेने त्यांची वाट पहायचे, आनंदाने त्यांचे मन असे शिगोशिग भरलेले असायचे की, तो आनंद वाटण्यासाठी ते उत्सुक असायचे. रात्री कालीच्या मंदिरात जाऊन ते म्हणायचे : "आई! तुझ्या भक्तांना तू येथे



घेऊन ये. म्हणजे मी त्यांच्याशी तुझ्या गोष्टी बोलेन आणि आनंदी आनंद करीन."

कधी आपल्या शिष्यांना ते सांगत : "काय सांगू रे, तुमच्या सगळ्यांची भेट व्हावी म्हणून मन किती व्याकुळ होई. तुमची भेट झाली की, मनाला अशा वेदना होत की वाटे मोठ्याने गळा काढून मनमुराद रडावे ! रात्री आरत्या सुरू झाल्या की वाटे आणखी एक दिवस निघून गेला आणि अजून कोणी आले नाही !"

त्यांच्याजवळ येणाऱ्या माणसावर हटकून परिणाम होई. त्याची वृत्ति पालटे, स्वभाव बदलून जाई. १८७० पासून एकेकजण त्यांच्याकडे येऊ लागला. रामकृष्ण सर्वांच्या जिज्ञासा तृप्त करीत.

नरेंद्र कॉलेजातला. आधुनिक तत्त्वज्ञानाशी त्याचा संबंध आलेला. मोठा चिकित्सक आणि थोडा खोडकर असा त्याचा स्वभाव. रामकृष्णांना तो भंडावून सोडायचा. रामकृष्णांचेही त्याच्यावर निरतिशय प्रेम होते. तो भेटला नाही तर ते कोणाला तरी खबर घ्यायला पाठवीत. एकदा त्याच्या भेटीची त्यांना एवढी ओढ निर्माण झाली की, दक्षिणेश्वरच्या झाऊ तलावाकडे ते एकटेच गेले आणि मोठ्याने रडू लागले. "नरेंद्रा, येरे. तुझ्यावाचून जीव बघ नुसता पिळवटून निघत आहे." असे म्हणत किती तरी वेळ ते हुंदके देत होते.

नरेंद्राचा सगुण उपासनेवर विश्वास नव्हता. त्यावरून रामकृष्णांचा आणि त्याचा वाद व्हायचा.

एकदा वादाच्या भरात नरेंद्र कालीवर तुटून पडला. रामकृष्ण एकाएकी भडकले. म्हणाले: "मला वाटेल ते बोल, पण माझ्या आईला नको बोल लावू." पण तरीही नरेंद्राच्या तोंडाचा पट्टा चालूच होता. तेव्हा ते संतापून म्हणाले; "नीघ इथून, कर तोंड काळे !"

नरेंद्र हिरमुसला. प्रत्यक्ष शान्ततेची मूर्ति मानावे, अशा रामकृष्णांना आपण खिजवलं याची त्याला खंत वाटत होती. तिकडे रामकृष्णही तळमळू लागले, आपण उगीच इतके कठोर बोललो, असे त्यांना वाटू लागले. घरात आई–मुलाचे भांडण झाल्यावर त्यांची जशी विचित्र अवस्था होते तसेच झाले होते.

शेवटी रामकृष्णांना राहवले नाही. ते कोपऱ्यात बसलेल्या नरेंद्राकडे गेले. त्याला जवळ घेऊन कुरवाळू लागले.

नरेंद्रानें त्यांना एकदा विचारले : " ईश्वर आहे का ?"

रामकृष्ण म्हणाले : " तुम्हांला मी जसे पाहातो, तुमच्याशी गप्पागोष्टी करतो तसेच ईश्वराला पाहातां येते, त्याच्याशी बोलता येते. परंतु तसे करायची इच्छा कोणाला असते? स्त्रीपुत्रांच्या शोकाने लोक घागर-घागर अश्रू गाळतात, संपत्ति गेली तर डोळे सुजेपर्यंत रडतात; पण ईश्वराची प्राप्ति झाली नाही म्हणून किती जण असे व्याकुळ होतात ? खऱ्या तळमळीने देवाचा धावा केला तर त्याला ईश्वरदर्शन झाल्यावांचून राहाणार नाही."

## बोध

खऱ्या सत्पुरुषाची स्थिति अशी असते की, त्याचे सहज बोलणे हाच उपदेश असतो. त्याचे वागणे म्हणजे लोकांना घालून दिलेला जणू धडा. रामकृष्णांचे वागणे असेच असे.

संग्रह करू नये. संग्रह समाजात एकीकडे चोरीला जन्म देतो आणि दुसरीकडे आपली नास्तिकता, ईश्वराबद्दलचा अविश्वास दाखवतो. मिळालेली वस्तु रामकृष्ण कधी बरोबर नेत नसत, कुणी फार आग्रह केला तर ते काकुळतीला येऊन म्हणत: "अरे, माझ्यावर दया करा, मला नका आग्रह करू, त्याचा मला दोष आहे."



त्यांच्या वडिलांना एक जमीन दान मिळाली होती. तिचे रजिस्ट्रेशन करावयाचे होते त्यानिमित्ताने त्यांना घरी बोलावले. रामकृष्ण घरी गेले. पण 'जमीन माझी' हे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर येईनात आणि तशा अर्थाच्या कागदावर सही करवेना. ते तसेच माघारी आले.

सत्यनिष्ठेवर त्यांचा फार भर असायचा. उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा करण्यासाठी त्यांची धडपड चालायची. शब्द पाळण्यासाठी ते व्याकुळ व्हायचे. कोणी शब्द पाळीत नाहीसे दिसले की, त्याची कानउघाडणी करायचे. म्हणायचे: " सत्यवचन हीच कलियुगातली तपस्या. बारा वर्षे जर काया-वाचा-मने सत्याचे पालन केले तर मनुष्य सत्यसंकल्प होतो." वेळेबाबतही ते असेच काटेकोर असायचे. दिलेला वेळ कटाक्षाने ते पाळीत.

शिष्यांवर रामकृष्णांचे आईसारखे प्रेम असे. त्यांच्याकडे कुणी कांही पदार्थ आणला की, ज्या शिष्याला तो आवडत असेल त्याच्यासाठी ते आठवणीने काढून ठेवीत. एखादा शिष्य बरेच दिवसांत आला नाही की,त्याची आठवण काढून ते रडू लागत.

त्यांचा एक शिष्य निरक्षर होता. रामकृष्ण त्याला म्हणाले: " बेटा, लिहावाचायला शीक."पण त्या शिष्याने दुर्लक्ष केले.

रामकृष्णांनी पुन्हा सांगितले तरी परिणाम नाही. शेवटी त्यांनी अंकलिपि आणवली आणि त्या शिष्याला ते स्वत: शिकवू लागले.

नामावर प्रेम, जीवावर दया आणि संतांची सेवा ही भक्ति-मार्गाची तीन साधने. रामकृष्ण म्हणत : " दया करणारे आपण कोण? गरजूहि तर ईश्वराचाच अंश. त्याच्यावर दया कशाची ? शिवज्ञानाने त्याचे त्याला अर्पण करायचे."

अध्यात्म, भक्ति म्हणजे बावळट भोंगळपणा अशी वेडी समजूत समाजात आहे.रामकृष्ण म्हणत : "भक्ति म्हणजे विचार खुंटीला टांगून नाही ठेवायचे. भक्त विचारी पाहिजे." गुडगुडी पेटवायला कोणी निष्कारण काडी ओढली की ते रागावत. म्हणत : "जा, आतून निखारा घेऊन ये. काडी काय फुकटची येते?" गबाळेपणा, अस्वच्छता त्यांना आवडत नसे " प्रत्येक वस्तूची काळजी घेतली पाहिजे" असे शिष्यांना ते सांगत.

रामकृष्ण लहान मुलासारखे निरागस. मुले त्यांना भारी आवडत. त्यांच्याशी ते खेळत. एकाद्या वेळी शिवाशिवी खेळत, झोके घेत. शिष्यांना गोष्टी सांगून धर्मरहस्य समजावून सांगत. त्यांनी सांगितलेल्या काही गोष्टी वानगीदाखल खाली दिल्या आहेत.

□

## सर्वत्र ईश्वर

एक गुरुजी अद्वैती होते. सर्वत्र भगवद्भाव पाहाण्याची त्यांची शिकवण होती. परंतु शिष्य होता पढीक. काल्पनिक शंका तो विचारायचा.

एकदा तो रस्त्याने जात होता. समोरून हत्ती आला. माहुताने बाजूला व्हायला सांगितले. शिष्य म्हणाला : "सर्वत्र देव भरलेला आहे. हत्तीहि ईश्वर आणि मीहि ईश्वर! ईश्वराला ईश्वराचे भय कसले ?" तो बाजूला झाला नाही.

हत्तीने त्याला सोंडेने उचलून बाजूला सारले. शिष्य गुरुजींकडे आला. गान्हाणे सांगू लागला. म्हणाला : " गुरुजी, सर्वत्र भगवद्भाव पाहायला तुम्हीं सांगता. आज मी हत्तीसमोर पाय रोवून उभा राहिलो तर त्याने सोंडेने मला दूर ढकलले. तो हत्ती ईश्वर आणि मीहि ईश्वर, मग असे का?"

गुरुजी म्हणाले : " तू ईश्वर, हत्ती ईश्वर आणि तो वरचा माहूतहि तर ईश्वरच.त्या माहुतामधल्या ईश्वराने तुझ्य.तल्या ईश्वराला बाजूला होण्याचा इशारा केला तो तू का ऐकला नाहीस ?"

## देवाचा धावा

दोन वाटसरू एकदा जंगलातून जात होते. ईश्वरासंबंधीच्या त्यांच्या गोष्टी चालल्या होत्या. सर्वव्यापी परमेश्वराबद्दल ते बोलत होते.

इतक्यात समोरच्या जाळीतून दोन डोळे लुकलुकले. हिरवे निळे आणि चमकदार."वाघ रे वाघ!" एकजण म्हणाला.

दुसरा म्हणाला : " घाबरू नकोस. आपल्याला पळण्याचे काहीच कारण नाही. ईश्वर सर्वशक्तिमान आहे, तो आपले रक्षण करीलच. तूच तर आता देवाच्या अशा गोष्टी सांगत होतास ना?"

भक्त म्हणाला : "आपण पळून जावे हे चांगले.जी गोष्ट आपल्या मेहनतीने होण्यासारखी आहे तिच्यासाठी परमेश्वराला आपण कष्ट का द्यावेत? आणि आपली शक्ति हीसुद्धा त्याचीच शक्ति आहे ना? ती पुरेपूर वापरू तर जरूर पडल्यावर तो आणखी देईल!"

## बाह्याचार ही कसोटी नव्हे

दोन मित्र एका गावात रहात होते. एकदा घरात करमेना म्हणून दोघे बाहेर निघाले, त्यांना कळले गावात कुठे कीर्तन आणि नाचगाणे आहे. दोघानाहि मनोरंजन करून घ्यायचे होते. एकजण गेला कीर्तनाला, दुसरा गेला नाचगाण्यासाठी.

नाच सुरू झाला तसा एकाच्या मनात विचार आला : “ फुकट इकडे आलो. ह्या नाचगाण्यात काय ठेवले आहे? भगवंताचे नाव कानावर गेले असते कीर्तनाला गेलो असतो तर! ” त्याचे मन देवाच्या नामासाठी व्याकुळ झाले, त्याचे चित्त त्या नाचगाण्यात लागेना.

दुसरा मित्र कीर्तनाला गेला होता. त्याच्या मनात आले :“काय बेटा हुशार. तिकडे नाचगाण्याची मजा चाखीत असेल आणि मी मात्र बसलो आहे इथे ‘विठ्ठल विठ्ठल’ करीत !” त्याच्या मनाला नाचरंगाचा ध्यास लागला होता !

दोघांची शरीरे कुठे या कसोटीने आपण त्याना मापू लागलो तर आपली परीक्षा हमखास चुकणार.म्हणून नुसत्या बाह्याचाराला भुलू नये, अंतरीचा भाव पहावा.

## चमत्कार

सिद्धि हस्तगत झाल्या म्हणजे मनुष्य थोडे-फार चमत्कार दाखवू शकतो. मण रामकृष्ण अशा गोष्टींच्या विरुद्ध होते, चमत्कारात शक्तींचा व्यय करू नये. ते म्हणत : “ एक गुरुशिष्याची जोडी होती. गुरूचा उपदेश ऐकून शिष्य साधनेला बसला. चौदा वर्षे त्याने तप केले आणि सिद्धी मिळवली. त्यामुळे त्याला पाण्यावरून चालत जाता यायला लागले. त्याला अत्यानंद झाला. तो धावतच गुरूजीकडे आला आणि प्रौढी सांगू लागला.

गुरुजी म्हणाले : “ चौदा वर्षे तप करून का दोनच पैसे मिळवलेस? नावाड्याला दोन पैसे दिले तर तो नेतोच ना पाण्यावरून ! ”

शरीराविषयी कोणी निष्काळजी असला की, रामकृष्ण त्याला म्हणत : “भक्तहि शरीराविषयी बेफिकीर राहू शकत नाही शरीर हे

आत्मारामाचे निवासस्थान आहे. त्याची काळजीं घेतलीच पाहिजे! रामकृष्णाची ही अशी प्रेरक शिकवण असे.

□

## महासमाधि

इकडे असा आनंदीआनंद चाललेला असताना १८८५ च्या उन्हाळयात एकाएकी रामकृष्णांच्या घशाला त्रास व्हायला लागला. उन्हाळयामुळे ते बर्फाचे पाणी पीत त्यामुळे असे होत असावे, असे आरंभी वाटले. परंतु मामुली इलाजांनी दुखणे थांबेना,दिवसेंदिवस ते वाढतच गेले, गळयाला सूजहि आली. परंतु रामकृष्णांचे सर्व कार्यक्रम जसेच्या तसे चालू होते.

ज्येष्ठ महिन्यात पानिहाटीला रघुनाथ गोस्वामी यांच्याकडे उत्सव असे. रघुनाथ गोस्वामी हे चैतन्यांचे अनन्य भक्त. ह्या उत्सवाला तुफान गर्दी व्हायची. दिंड्या, मेळे येत मोठी यात्राच भरे. रामकृष्ण व त्यांचे शिष्य यांनी या यात्रेला जायचे ठरवले. ठरले असे होते की, दुरून सगळे पाहून ताबडतोब परत यायचे.परंतु तेथील भक्तीचा तो गदारोळ पाहून रामकृष्णांचे देहभान हरपले. ते न कळत दिंडीत सामील झाले. नाचू गाऊं लागले. त्यांच्या नृत्यातून आनंद नुसता ओसंडून वहात होता.

रामकृष्णांचा तो अद्भुत भाव पाहून त्यांच्या भोवती फेर धरून इतर लोकहि नाचू लागले. वरून पाऊस कोसळत होता. सगळेजण न्हाऊन निघत होते. पण त्या आनंदाच्या भरात कोणालाच त्याचे भान नव्हते. पानिहाटीपासून जेमतेम मैलभर अंतरावर चैतन्यांचा दुसरा एक शिष्य राघव पंडीत राही. त्याच्या घरच्या राधाकृष्णाचे दर्शन करण्यासाठी दिंडी निघाली. मैलभर जायला दिंडीला तीन तास लागले.

रामकृष्ण शिष्यांना म्हणाले : "भगवन्ताच्या सगळ्या भक्तांशी आपली मैत्री पाहिजे. सगळे भक्त हे भाऊ भाऊ असतात."

संध्याकाळी सगळी मंडळी घरी आली. रामकृष्णांना फारच थकवा आला होता. रात्रभर त्यामुळे त्यांना धड झोपहि आली नाही.

त्यांच्या प्रकृतीला आराम पडेना तेव्हा शिष्यांनी ठरविले की, हवापालट व्हावा म्हणून त्यांना शहराबाहेर काशीपूर भागात रहायला न्यावे. त्याप्रमाणे सर्व मंडळी काशीपुरांत राहायला गेली. शारदामणी आणि विवेकानंद रामकृष्णांची अनन्य भावाने सेवा चाकरी करू लागले.

रामकृष्णांचा आजार कमी पडेना तेव्हा डॉक्टर बोलविण्याच्या मसलती सुरू झाल्या. डॉक्टर सरकार हे कलकत्त्यातले त्या काळी, सर्वोत्कृष्ट डॉक्टर समजले जात. त्यांना आणावे असा बूट निघाला रामकृष्णांना विचारण्यात आले. रामकृष्ण म्हणाले : "त्यांना माझे नाव सांगू नका. सांगा एक गरीब मनुष्य आजारी आहे. त्याला पाहायला येता का ? असे सांगून ते आले तर येऊ देत."

डॉक्टर सरकार आले, रामकृष्णांना तपासून औषध देऊं लागले. रामकृष्णांचे बोलणे ऐकत त्यांनी तासच्या तास बसावे. तिकडे दवाखान्याकडे त्यांचे लक्षच लागू नये, अशी स्थिती झाली. रामकृष्णांचे त्यांनी शिष्यत्व पत्करले.

रामकृष्णांना त्रास होतो असे पाहून ते म्हणायचे ? "ठाकूर, तुम्ही बोलू नका."

"तुम्हीं इतक्या लांबून येता. तुम्हा मंडळींना द्यायला माझ्या जवळ काय आहे ? चार गोड शब्द प्रेमाने बोलायचे नाहीत म्हणजे काय ?" रामकृष्ण म्हणत. रामकृष्णांचे प्रत्येकाशीं थोडेफार बोलणे होई. हळूहळू गर्दी वाढू लागली. त्याच्या कंठाला क्षते पडली आणि त्यातून रक्त वाहू लागले. त्यांचा रोग वाढला तशी शिष्यांची व्याकुळता वाढली,

पुढे त्यांच्या घशाचा ठणका थोडा कमी झाला. क्षत सुधारले,

अन्नहि थोडे जाऊ लागले. आता आपल्याजवळचे आहे नाही ते सगळे देऊन टाकायला जणू रामकृष्ण निघाले होते. नाना प्रकारच्या गोष्टी ते बोलत. संसाराचे एकदा त्यांनी रहस्य सांगितले. म्हणाले : " कामकांचनत्याग संन्याशासाठी, संसारी लोकांनी मनाने त्याग करावा. "

नरेंद्राकडे आतां ते खास लक्ष देऊ लागले, एकान्तात त्याला नाना रहस्ये समजावून सांगत. अध्यात्ममार्गावरील विविध साधना त्याच्याकडून करवून घेत. त्यांची जणू निरवानिरव चालली होती.नरेंद्राला म्हणाले : " हे पहा, माझे काम आता तुलाच करायचे आहे. "

रामकृष्ण निरवानिरवीच्या गोष्टी करू लागले तेव्हा शिष्यांनी व्याकुळ होऊन विचारले : " महाराज, आपण गेल्यावर आम्हांला मग कोण ? "

रामकृष्ण म्हणाले : " हा नरेंद्र आहे, तो शिकवील. "

नरेंद्र म्हणाला : " महाराज, हे अवघड काम आहे, ते माझ्याच्याने नाही होणार. "

" नाही होणार ? तू काय सांगतोस? अरे, तूच काय, पण तुझी हाडेसुद्धा करतील ! "

एक दिवस त्यांनी नरेंद्राला ध्यान करीत बसवले. ध्यान उतरल्यावर नरेंद्र पाहातो तो रामकृष्ण अश्रू गाळीत बसलेले. त्याला म्हणाले : " आज माझ्याजवळचे सगळे सगळे तुला दिले. आज मी खरा फकीर बनलो. "

पुन्हा रोग वाढू लागला तसे रामकृष्णांना अन्न जाईना. घास दोन घास खाणेहि दुरापास्त होऊ लागले. शिष्यांनी त्यांच्याजवळ हट्ट धरला. म्हणाले : " आई तुमचं सर्वस्व. कर्तुमकर्तुम् शक्ति तिच्यात. तुमच्या ह्या वेदना आमच्याने [illegible] सांगून ह्या वेदना थांबवा ना तुम्हीं."

BVBK-0400358

रामकृष्ण म्हणाले: " माझ्या तोंडून ही वाक्ये निघतच नाहीत."

शिष्यांनी तरीहि आग्रह धरला. रामकृष्ण एकदम तन्मय झाले. त्यानंतर काही वेळाने शिष्यांनी विचारले : " काय झाले ?"

रामकृष्ण म्हणाले : " मी आईला म्हणालो : आई या रोगामुळे काही खाता येत नाही बघ. जरा दोन घास खाता येतील, असे कर ना ! यावर तुम्हा सगळ्यांकडे बोटे दाखवून आई म्हणाली : का बरे? इतक्या ह्या सगळ्या तोंडांनी तूच नाहीस का खात ? तिचे हे बोल ऐकून मला शरम वाटली !"

रामकृष्णांना जणु रोगाचा विसर पडला. शरीर थकत चालले होते पण रामकृष्णांचा आनंद वाढत होता. त्यांचे ज्ञानसत्र अखंड चालू होते. उत्साह वाढता होता.

ता. १६ ऑगस्ट १८८६ रोजी रामकृष्णांनी महासमाधि घेतली. त्यांच्या अंत्ययात्रेला हजारो लोक जमले, हरिनामाचा गरज करीत शंखमृदंग वाजवीत यात्रा निघाली.गंगेच्या किनाऱ्यावर दाहसंस्कार करण्यात आले.अस्थिसंचयानंतर सात दिवस अस्थिकलश काशीपुर मध्ये दर्शनार्थ ठेवला होता. हजारो लाखोंनी त्यांचे दर्शन घेतले. त्यानंतर तो कलश कांकडगाधी येथे जमिनीत पुरून टाकला. तेथे नित्यनेमाने पूजा होते. दिवाळी आणि जन्माष्टमीला दरसाल दोनदा तेथे मोठा उत्सव साजरा होतो.

रामकृष्णांनी आपल्या सोळा शिष्यांना दीक्षा दिली होती. विवेकानंदांनी ह्या सहकाऱ्यांसह रामकृष्णांचे कार्य पुढे चालविण्याचे ठरवले. सहा-सात वर्षे अध्ययन, चिंतन आणि साधना करून अमेरिकेत शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेसाठी ते गेले आणि रामकृष्णांचा संदेश त्यांनी तेथे ऐकवला. अमेरिकेत व इतरत्र त्यांनी व्याख्याने दली देशातहि सर्वत्र त्यांनी रामकृष्णांचा संदेश ऐकवला.

रामकृष्ण मिशन ही संस्था विवेकानंदांनी स्थापन केली,बेलूर मठ

हे मशिनचे मुख्य केंद्र आहे. संन्यासी हे खरे मिशनरी आहेत. आर्त-दु:खितांची सेवा, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी साह्य, शाळा आणि लोकशिक्षणार्थ प्रकाशने, दवाखाने इत्यादि कामे मिशनतर्फे चालतात. 'जनी जनार्दन' समजून समाजसेवा करणे, हेच खरे अध्यात्म आहे हे त्यांनी दाखवून दिले. रामकृष्ण मिशनच्या रूपाने रामकृष्णांचे जिवंत स्मारक ठिकठिकाणी करण्यात आले आहे.

गुलामगिरीमुळे सर्व भारतीय आत्मविश्वास गमावून बसले होते. धर्माची तत्त्वे विशुद्ध राहिली नव्हती. रूढी आणि लोकाचार यात धर्म चिरडला गेला होता. परक्यांच्या विद्वेषावर स्वधर्माभिमानाचे पोषण करण्याचा विपरीत प्रयत्न होत होता. रामकृष्णांनी देशांत आत्मविश्वास आणि श्रद्धा जागृत केली. धर्माचे विशुद्ध रूप दाखवले. ज्ञान आणि सेवा यांतूनच धर्मोदय होतो हे शिकवले. धर्म म्हणजेच बाह्य विधिविधाने आणि कर्मठपणा नव्हे, हे त्यांनी शिकविले. वेगवेगळ्या धर्मात विरोध पाहाणे चूक आहे, हे त्यांनी कृतीने दाखवून दिले. सर्वधर्मसमभावाचा त्यांनी जणु पाया घातला. स्त्रीशुद्रांना हीन लेखण्याची समाजातील प्रवृत्ति त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणाने दूर केली. स्त्री ही साधना-मार्गात अडथळा बनते असा प्रवाद आहे. रामकृष्णांनी आपल्या पत्नीना अखेरपर्यंत जवळ ठेवले व त्यांनाहि मित्राप्रमाणे अध्यात्मात उन्नति करण्याला त्यांनी साह्य केले. स्त्रियांची माणूस म्हणून त्यांनी प्रतिष्ठा केली.

आधुनिक भारताची उभारणी ज्या गुणांवर झाली आहे त्याचा पाया रामकृष्णांनी घातला. त्यांची भावाकुलता, सर्वाभूती भगवद्भ व पाहणारी त्यांची बुद्धि, अनंत कष्टातहि न चळवणारी त्यांची आत्मौपम्य वृत्ति, त्यांचा सेवामय प्रेमभाव पिढ्यान् पिढ्या स्फूर्ति देत राहातील.

354C